# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ)

जा.क्र. ६४१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०४/१०/२०१६

**१) मारोती स्विप्ट गाडीची पायी जाणा—यास धडक . :—**

दिनांक ०३/१०/२०१६ रोजी १२.२० वा. दरम्यान. यातील जखमी बाळकु चिंतामन वलथरे वय ४७ वर्ष रा. गणेश वार्ड साकोली हा नशिने वाईन शॉप वरून एनएच ६ आम रोड क्रॉस करीत असतांना सेंदुरवाफा कडुन लाखनी कडे जाणा—या मारोती स्विप्ट गाडी क्र. सीजी ०७ एसी ९२९८ चा आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने, लापरवाहीने चालवुन पायी जाणा—यास धडक मारून जखमी करून पळुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. पाटील यांचे चौकशी अहवाल व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भांदवि सहकलम १३४/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) मोबाईल फोन चोरीच्या आरोपा वरून अश्लिल शब्दात शिविगाळ व जिवे मारण्याची धमकी . :—**

दिनांक ०३/१०/२०१६ रोजी ०८.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादीचा मोबाईल फोन हरविल्याने संशयावरून आरोपी विरूध्द पो.स्टे. पवनी ला तक्रार दिली होती यातील आरोपी हा फिर्यादीचे घरा समोर येवुन तुने मला मोबाईल चोरीचा आरोप लावला आहेस असे बोलुन, भांडण करून अश्लिल शब्दात शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी श्रीधर हरिभाऊ सावरबांधे वय ५७ वर्ष रा. शिवनाळा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,५०६ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावणे पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक ०३/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ९६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०६ तिन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व ईतर वाहनांवरती ८९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र.८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.